# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
## फी निश्चिती समिती

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, दुसरा मजला, 49, खेरवाडी, आलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051.
ईमेल:msbteffcmumbai@gmail.com दूरध्वनी क्रमांक:02262542112 वेब:www.msbteffc.in


जा.क्र. /फीनिस/ का-०३ /२०२४/ २५ दि. 28 JUN 2024

**परिपत्रक**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष.२०२२-२३ मध्ये औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन उशीरा मान्यता मिळालेल्या संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची फी निश्चिती बाबत.

**संदर्भ :-** सुचना क्र. FFC/D-३/२०२४/००२ दि. १२ एप्रिल २०२४

संदर्भीय विषयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची फी निश्चिती करताना आर्थिक वर्ष २०२२-२३ चा खर्चाचा तपशील (Audited accounts) विचारात घेतला जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये औषधनिर्माणशास्त्राच्या नवीन अभ्यासक्रमांना उशीरा मान्यता मिळाल्याने अशा संस्थांचे प्रवेश उशीरा झालेले आहेत. सदर संस्थांचा आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीत खर्च कमी झाल्यामुळे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताच्या फी निश्चिती बाबत निवेदन सादर केले होते. समितीने अशा संस्थांची फी निश्चिती करण्यापुर्वी सदर संस्थांच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ चा खर्चाचा तपशील (Audited accounts) मागवून घेण्याबाबतच्या सुचना केलेल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन उशीरा मान्यता मिळालेल्या संस्थांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, संस्थांनी त्याचा आर्थिक वर्ष २०२३-२४ चा खर्चाचा तपशील (Audited accounts) समिती कार्यालयास दि. ०८/०७/२०२४ रोजी सायं. ०५:०० वाजे पर्यंत सादर करावा.

उपरोक्त नमुद केलेल्या कागदपत्रांच्या संस्थेने प्रमाणित केलेल्या सुस्पष्ट प्रती, पृष्ठांकन आणि अनुक्रमणिका जोडून Spiral bound करुन या कार्यालयास व्यक्तिश: सादर करण्यात याव्यात. पोष्ट, कुरियर, ई-मेल इत्यादी माध्यमातून पाठवलेल्या माहितीचा विचार करण्यात येणार नाही.

(प्रमोद वायसे)
सदस्य सचिव, फी निश्चिती समिती

प्रत :- मा. अध्यक्ष फी निश्चिती समिती तथा मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.